नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १८४ | Issue - 184 | वार गुरूवार दि. २१ नोव्हेंबर २०२४ | Blow- Thursday Date 21 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्यात महायुती, मविआमध्ये चुरस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: महाराष्ट्रात पुढील सरकार कोणाचे येणार याचा फैसला आज मतदारांनी घेतला असून राज्यातील २८८ मतदारसंघातील मतदान प्रक्रिया पूर्ण झाली. आता सर्वांना प्रतिक्षा आहे ती २३ तारखेला जाहीर होणाऱ्या निकालाची होय. राज्याच्या राजकारणात २०१९ नंतर झालेल्या मोठ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत जनता महाविकास आघाडीला की महायुतीला कौल देते याचे उत्तर शनिवारी मिळणार असले तरी त्याआधी विविध संस्था आणि वृत्तवाहिन्यांनी केलेल्या एक्झिट पोल निकाल समोर आले आहेत. या एक्झिट पोलमध्ये राज्यात कोणाची सत्ता येईल, कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील आणि मतांची टक्केवारी किती असेल याचा अंदाज व्यक्त केला जातो. जाणून घेऊयात या सर्व एक्झिट पोलचा महापोल काय सांगतो.



### निकालाच्या आधीचा निकाल! काय सांगतोय महाराष्ट्राचा पोल ऑफ पोल्स

विविध एक्झिट पोलनुसार राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार देणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. राज्यात सर्वात मोठा पक्ष भाजप असेल असे देखील जवळ जवळ सर्वच एक्झिट पोलमध्ये म्हटले आहे.

P-Marqच्या एक्झिट पोलनुसार राज्यात भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीला १६० जागा तर महाविकास आघाडीला ११९ जागा, अन्यला ९ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

Matrizeच्या एक्झिट पोलमध्ये राज्यात महायुतीला १५० ते १७० जागा आणि महाविकास आघाडीला ११० ते १३० जागा मिळण्याची शक्यता आहे. अन्यला ८ ते १० जागा मिळतील असा अंदाज चर्चीळूशने व्यक्त केला आहे. चर्चीळूशच्या एक्झिट पोलनुसार भाजपला ११३, शिवसेना शिंदे गटाला ५२, काँग्रेसला ३५, शरद पवार गटाला ३५, उद्धव ठाकरे गटाला २७, राष्ट्रवादी अजित पवार गटाला १७ तर अन्यला ९ जागा मिळतील असा अंदाज आहे.

Peoples Pulseच्या एक्झिट पोलनुसार राज्यात सत्ताधारी महायुतीला १७५ ते १९५ जागा, महाविकास आघाडीला ८५ ते ११२ जागा तर अन्यला ७ ते १२ जागा मिळण्याची शक्यता आहे.

Chanakya Strategiesनुसार राज्यात भाजपच्या नेतृत्वाखालील (पान ३ वर...)

## सायंकाळी ६ वाजेपर्यंत सोलापूर जिल्ह्यात सरासरी ६५.४१ टक्के मतदान

### ३८ लाख ४८ हजार ८६९ मतदारांपैकी २५ लाख १७ हजार ३७४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २० नोव्हेंबर २०२४ रोजी सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात आज मतदान घेण्यात आले. जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात सकाळी सात ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत सरासरी एकूण ६५.४१ टक्के मतदान झालेले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. जिल्ह्यात एकूण ३८ लाख ४८ हजार ८६९ मतदार असून आज सकाळी सात ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत २५ लाख १७ हजार ३७४ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावलेला आहे. यामध्ये पुरुष मतदार १३ लाख १७ हजार ३६४, स्त्री मतदार ११ लाख ९९ हजार ९१२ तर तृतीयपंथी ९८ मतदाराने मतदान केलेले आहे. मतदानाची एकूण सरासरी ६५.४१% झालेली आहे.




विधानसभा निहाय झालेले एकूण मतदान व मतदानाची टक्केवारी खालील प्रमाणे.....

२४४ करमाळा विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख २३ हजार २०७ मतदारांनी मतदान केले (६७.८५%).

२४५ माढा विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ४८ हजार १६७ मतदारांनी मतदान केले असून ७०.३६% टक्के मतदान झाले.

२४६ बार्शी विधानसभा मतदारसंघात २ लाख ४४ हजार ७४० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला मतदानाची टक्केवारी ७२.५२%.

२४७ मोहोळ अनुसूचित जाती विधानसभा मतदारसंघात २ लाख २७ हजार ४४४ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ६८.६२% आहे.

२४८ सोलापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात एकूण १ लाख ८६ हजार ३७ मतदारांनी मतदान केले असून ५६.६२ टक्के मतदान झालेले आहे.

२४९ सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघात एकूण १लाख ८४ हजार ९७३ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची सरासरी ५३.३६% आहे.

२५० अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ४६ हजार ६९९ मतदारांनी मतदान केले असून टक्केवारी ६४.३३% आहे.

२५१ सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ३३ हजार ३४२ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ५८.३५ टक्के आहे.

२५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ५७ हजार ७२६ मतदारांनी मतदान केलेले आहे. मतदानाची टक्केवारी ६८.९७.

२५३ सांगोला विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ४५ हजार ४२० मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ७३.५९% आहे.

२५४ माळशिरस अनुसूचित जाती मतदार संघात एकूण २ लाख २९ हजार ६१९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून मतदानाची सरासरी टक्केवारी ६५.६९% आहे.

## थोडक्यात

### बीडमध्ये अपक्ष उमेदवाराचा मृत्यू



छत्रपती संभाजीनगर : बीड विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार बाळासाहेब शिंदे (वय ४०) यांचा मतदान केंद्रावरच हृदयविकाराने मृत्यू झाला.

बीड शहरातील शिंदेनगर भागातील रहिवासी असलेले शिंदे हे सकाळी मतदान केंद्रांवर आढावा घेण्यासाठी बाहेर पडले होते. या दरम्यान, छत्रपती शाहू विद्यालयातील केंद्रावरच त्यांना भोवळ आली. ते कोसळले. तातडीने त्यांना शहरातील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथून त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, तेथे त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केल्याचे निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले.

## बिटकॉइन घोटाळ्याप्रकरणी ईडीची मोठी कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात आज विधानसभेचे मतदान पार पडत असताना बिटकॉइन घोटाळा समोर आला आहे. पुण्यातील माजी पोलीस अधिकारी रवींद्र पाटील यांनी निवडणुकीत परकीय चलन वापरल्याचा आणि आर्थिक व्यवहारांसाठी बिटकॉइनचा वापर केल्याचा आरोप केला होता. तसेच भाजपाचे खासदार, प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनीही मंगळवारी रात्री पत्रकार परिषद घेऊन कॉल रेकॉर्डिंग्स व व्हॉट्सअॅप चॅट्सचे स्क्रीनशॉट प्रसिद्ध केले होते. सुप्रिया सुळे आणि नाना पटोले यांच्या कथित आवाजातील ऑडिओ क्लिपही समोर आली होती. आता या प्रकरणी ईडीने मोठी कारवाई केली आहे. सुप्रिया सुळे यांच्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये ज्या




गौरव मेहताचा उल्लेख झाला. त्याच्या रायपुर मधील घरी ईडीने धाड टाकली आहे. २०१८ साली झालेल्या क्रिप्टोकरन्सी घोटाळ्याप्रकरणाचा तपास करण्यासाठी धाड टाकल्याचे सांगण्यात आले.

माजी आयपीएस अधिकारी रविंद्र पाटील यांनी २०१८ च्या क्रिप्टोकरन्सी घोटाळ्यात गौरव मेहता हा प्रमुख आरोपी असल्याचे म्हटले होते. गौरव मेहता हा एका ऑडिट फर्मचा कन्सलटन्ट असून पुणे पोलीस ६,६०० कोटींच्या क्रिप्टोकरन्सी घोटाळ्याप्रकरणी त्याची चौकशी करणार आहे. रविंद्र पाटील यांनी दावा केला की, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गौरव मेहताला फोन करून क्रिप्टोकरन्सी घोटाळ्यातील रक्कम निवडणुकीच्या कामासाठी मागितली होती.

रविंद्र पाटील यांनी आरोप केला की, सुप्रिया सुळे आणि नाना पटोले यांनी २०१८ च्या बिटकॉइन घोटाळ्याचा गैरवापर केला असून या घोटाळ्यातील पैशांचा वापर महाराष्ट्रातील निवडणुकांसाठी केला.

दरम्यान, सुप्रिया सुळेंनी आज सकाळी मतदानानंतर माध्यमांशी बोलताना या आरोपांवर उत्तर दिलं आहे. एकतर काल संध्याकाळी मला माध्यमांमधून कळलं की असे आरोप झाले आहेत. माझ्या हातात ते व्हॉइस रेकॉर्डिंग आल्यानंतर मी पहिली गोष्ट केली ती म्हणजे पुण्याच्या पोलीस आयुक्तांना अर्थात अमितेश कुमार यांना फोन केला. मी त्यांना सांगितलं की काही बनावट रेकॉर्डिंग फिरत आहेत आणि मला सायबर क्राईमकडे तक्रार करायची आहे. त्यांनी सांगितलं तुम्ही तक्रार करा. मी काल संध्याकाळीच ऑनलाईन तक्रार दाखल केली आहे की या सगळ्या रेकॉर्डिंग्ज आणि मेसेजेस खोटे आहेत, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी

## सायंकाळी ६ वाजेपर्यंत राज्यात ६५.११ टक्के मतदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी राज्यात सायंकाळी ६ वाजेपर्यंत राज्यात सरासरी ६५.११ टक्के मतदान झाले आहे.

राज्यातील जिल्हानिहाय मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे :




अहमदनगर - ७१.७३ टक्के, अकोला - ६४.९८ टक्के, अमरावती - ६५.५७ टक्के, औरंगाबाद- ६८.८९ टक्के, बीड - ६७.७९ टक्के, भंडारा - ६९.४२ टक्के, बुलढाणा - ७०.३२ टक्के, चंद्रपूर- ७१.२७ टक्के, धुळे - ६४.७० टक्के, गडचिरोली - ७३.६८ टक्के, गोंदिया - ६९.५३ टक्के, हिंगोली - ७१.१० टक्के, जळगाव - ६४.४२ टक्के, जालना - ७२.३० टक्के, कोल्हापूर - ७६.२५ टक्के, लातूर - ६६.९२ टक्के, मुंबई शहर- ५२.०७ टक्के, मुंबई उपनगर -५५.७७ टक्के, नागपूर - ६०.४९ टक्के, नांदेड - ६४.९२ टक्के, नंदुरबार- ६९.१५ टक्के, नाशिक - ६७.५७ टक्के, उस्मानाबाद - ६४.२७ टक्के, पालघर - ६५.९५ टक्के, परभणी - ७०.३८ टक्के, पुणे - ६१.०५ टक्के, रायगड - ६७.२३ टक्के, रत्नागिरी - ६४.५५ टक्के, सांगली - ७१.८९ टक्के, सातारा - ७१.७१ टक्के, सिंधुदुर्ग - ६८.४० टक्के, सोलापूर - ६७.३६ टक्के, ठाणे - ५६.०५ टक्के, वर्धा - ६८.३० टक्के, वाशिम - ६६.०१ टक्के, यवतमाळ - ६९.०२ टक्के मतदान झाले आहे.

### जगातील पहिल्या दहा प्रदूषित शहरांमध्ये देशातील आठ शहरे

### राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची माहिती

## दिल्ली जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून दिल्लीची हवा अति धोकादायक पातळीवर गेली आहे. बुधवारी (२० नोव्हेंबर) दुपारी चार वाजता दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक ४३८ वर गेला होता. दिल्लीची गणना जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून होत आहे. जगातील पहिल्या दहा प्रदूषित शहरांमध्येही देशातील आठ शहरांचा समावेश होता.

राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी (२० नोव्हेंबर) दुपारी चार वाजताच्या आकडेवारीनुसार दिल्ली जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर होते. दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक चार वाजता ४३२ वर गेला होता. हवेत २.५ मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण २९१, तर १० मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण ४१३, कार्बन मोनोऑक्साईडचे प्रमाण १२२९ पीपीबी, सल्फर डायऑक्साईचे प्रमाण ५ पीपीबी, नायट्रोजन ऑक्साईडचे प्रमाण २८ पीपीबी, ओझोन १० पीपीबी होते.

दुसऱ्या क्रमांकावर उत्तर प्रदेशातील हापूर (हापुड) असून, हवा गुणवत्ता निर्देशांक ४२२ इतका होता. हवेत २.५ मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण २६३, तर १० मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण ४४७, कार्बन मोनोऑक्साईडचे प्रमाण १५५३ पीपीबी, सल्फर डायऑक्साईचे प्रमाण ८ पीपीबी, नायट्रोजन ऑक्साईडचे प्रमाण १२ पीपीबी, ओझोन १४ पीपीबी होते.

तिसऱ्या क्रमांकावर चीनच्या हेलॉन्गजियांग प्रातांतील दकिंग शहर असून, वायू गुणवत्ता निर्देशांक ४०१ आहे. हवेत २.५ मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण २५२, तर १० मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण ३३०, कार्बन मोनोऑक्साईडचे प्रमाण १३१६ पीपीबी, सल्फर डायऑक्साईचे प्रमाण ६ पीपीबी, नायट्रोजन ऑक्साईडचे प्रमाण ३५ पीपीबी, ओझोन ८ पीपीबी होते.

हवा निर्देशांकानुसार, ० ते ५० हवा निर्देशांक असेल तर चांगली हवा, ५० ते १०० निर्देशांक असेल तर समाधानकारक, १०० ते २०० निर्देशांक असेल तर मध्यम, २०० ते ३०० निर्देशांक असेल तर वाईट, ३०० ते ४०० निर्देशांक असेल तर अत्यंत वाईट, ४०० पेक्षा जास्त निर्देशांक असेल तर हवा अति धोकादायक मानली जाते.

जगातील पहिल्या दहा सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये भारतातील आठ शहरांचा समावेश आहे. दिल्ली पाठोपाठ उत्तर भारतातील अनेक शहरांतील हवेची गुणवत्ता वाईट किंवा अति धोकादायक पातळीवर पोहचली आहे.

हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार प्रदूषित शहरे (कंसात हवा गुणवत्ता निर्देशांक) नवी दिल्ली - ४३८, हापूर (उत्तर प्रदेश) - ४३०, भिवानी (हरियाणा) ४०४, दकिंग (चीन) ३९८, गुरुग्राम (हरियाणा) ३८३, गझियाबाद (उत्तर प्रदेश) - ३६५, सोनीपत (हरियाणा) ३५१, मेरठ (उत्तर प्रदेश) ३५१, अद दिरियाह (सौदी अरेबिया) ३४४, नोएडा (उत्तर प्रदेश) ३४१.

सुक्ष्म कण मानवी आरोग्याला घातक

थंडी, दाट धुक्यामुळे हवेची गुणवत्ता खालावते. हवेची आर्द्रता आणि घनता वाढल्यामुळे हवेत प्रदूषित कण जास्त वेळ टिकून राहतात. प्रामुख्याने २.५ मायक्रॉन किंवा त्यापेक्षा कमी (सुक्ष्म कण) आकाराचे प्रदूषित कण श्वासोच्छवासातून मानवी शरीरात सहजपणे जातात. त्यामुळे २.५ मायक्रॉनपेक्षा कमी आकाराचे कण मानवी आरोग्यास जास्त धोकादायक ठरतात, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिली.

### थंडी, दाट धुक्यांमुळे हवा बिघडली

**गेल्या आठवड्याभरापासून दिल्लीसह उत्तर भारतात थंडी आणि दाट धुके पडत आहे. थंडी, दाट धुके आणि वाऱ्याचा प्रवाह मंद असल्यामुळे हवेत धुळीचे, धुराचे कण साचून राहतात. हवेची घनता जास्त असल्यामुळे दहा मायक्रॉनच्या वरील प्रदूषित कणही जमिनीवर लवकर पडत नाहीत. घनता वाढलेल्या हवेत धूर, धुळीचे कण, वाहनांच्या धुरातून बाहेर पडणारे लहान कण साचून राहतात. वाऱ्याचा प्रवाह मंद असल्यामुळे प्रामुख्याने शहरांवर प्रदूषित हवा जास्त काळ टिकून राहते. त्यामुळे उत्तर भारतातील शहरांचा हवा गुणवत्ता निर्देशांक बिघडला आहे.**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### एक्झिट पोलचा अंदाज

मागील ५ वर्षांत राज्यात अभूतपूर्व घडामोडी घडल्या. चित्रविचित्र आघाड्या, युत्या राज्यातील जनतेनं पाहिल्या. आपण मत कोणाला दिलं आणि ते नेमकं कुठे गेले, असा प्रश्न मतदारांना पडला. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आज राज्यात विधानसभा निवडणुकीचं मतदान पार पडलं. या मतदानानंतर विविध एजन्सीचे एक्झिट पोल येऊ लागले आहेत. चाणक्य स्ट्रॅटेजीसच्या सर्व्हेनुसार राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार येऊ शकतं. चाणक्य स्ट्रॅटेजीसच्या सर्व्हेनुसार, महायुतीला १५२ ते १६० जागा मिळू शकतात. बहुमतासाठी १४५ चा जादुई आकडा गरजेचा आहे. तो महायुती पार करेल, असा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे. भाजप सलग तिसऱ्यांदा भाजप राज्यात विधानसभेत सगळ्यात मोठा पक्ष ठरण्याची शक्यता आहे. सलग तिसऱ्यांदा भाजप ही किमया साधेल असा अंदाज आहे. चाणक्य स्ट्रॅटेजीसच्या सर्व्हेनुसार भाजपला ९० जागा मिळू शकतात. भाजपसोबत सत्तेत असलेल्या शिवसेनेला ४८ जागा, तर अजित पवारांना २२ जागा मिळू शकतात. याचा अर्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना त्यांच्या आमदारांचा आकडा कायम राखताना दिसत आहे. तर अजित पवारांना सर्वात मोठा धक्का बसताना दिसताना आहे. अजित पवारांसोबत ४० आमदारांनी शरद पवारांची साथ सोडली. काँग्रेसचे काही आमदारही नंतर त्यांच्यासोबत आले. पण अजित पवारांना मोठा धक्का बसेल असं सर्व्हे सांगतो. दुसरीकडे महाविकास आघाडी १३० ते १३८ जागा जिंकून बहुमताच्या जवळ जाताना दिसत आहे. काँग्रेस मविआतील सगळ्यात मोठा पक्ष ठरू शकतो. त्यांना ६३ जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर शिवसेना उबाठाला ३५, राष्ट्रवादी काँग्रेसला ४० जागा मिळू शकतात. ठाकरेंना शिंदेंच्या तुलनेत कमी यश पाहायला मिळेल असा अंदाज आहे. त्याचा फटका मविआला बसताना दिसत आहे. महायुतीत भाजपनं सर्वाधिक १४८, शिवसेनेनं ८१ आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं ५९ जागा लढवल्या आहेत. तर मविआमध्ये काँग्रेसनं १०१, शिवसेना उबाठानं ९५, तर राष्ट्रवादी शपला ८६ जागा मिळाल्या. राज्यात बसपनं २३७, तर एमआयएमनं १७ उमेदवार दिले होते.

# चांगल्या कामाला किंमत नाही?

गुरुजी, आता तरी चपला घालाल काय?

पत्रकारानं एका गुरुजींना विचारलेला प्रश्न. त्या गुरुजींनी आपली पादत्राणे त्यागली होती. त्याचं कारणही तसंच होतं. ते होतं, त्यांनी केलेलं महान कार्य. जे कार्य त्यांनी केलं होतं, त्या कार्याची दखल जरी घेतली असली तरी त्या शिक्षकाची दखल न घेतली गेल्यानं तसेच त्यांच्यात दोष दाखवून त्यांच्यावर आरोप केले होते. त्यानंतर संबंधीत शिक्षकानं पादत्राणे त्यागली. शेवटी जेव्हा त्यांना दोषातून मुक्ती मिळाली, त्यानंतर पत्रकारानं त्यांना विचारलेला प्रश्न. त्यावर गुरुजीनं अतिशय शांत राहून उत्तर दिलं, नाही, मी अजिबात चपला घालणार नाही. कारण माझ्या विद्यार्थ्यांचं बरंच नुकसान झालंय.

चपला घालणे न घालणे हा त्यावरचा उपाय नाही. मग ते गुरुजी तसं का बोलले? त्याचं कारण होतं त्यांनी केलेलं कार्य. त्यांनी अतिशय निरपेक्षरितीनं आपलं कार्य केलं होतं. विद्यार्थ्यांना केवळ वेतन मिळतं म्हणून तयार केलं नव्हतं तर विद्यार्थी आपल्या स्वतःचीच मुलं आहे असा विचार करुन त्यांना तयार केलं होतं. कारण शिकविण्याचं काम सर्वच शिक्षक करतात. मात्र चांगलं शिकविण्याचं काम कोणताच शिक्षक करीत नाही.

वारे गुरुजी त्यांचं नाव. त्यांनी वाबडेवाडीच्या शाळेत जेव्हा प्रवेश केला. तेव्हा तेथील पटसंख्या जेमतेम होती. त्यावेळेस त्या शाळेत दोनच शिक्षक होते. त्यानंतर त्यांनी विचार केला. आपण आपल्या शाळेची पटसंख्या वाढवावी. असा विचार करताच त्यांनी कल्पना केली की जर या विद्यार्थ्यांना कल्पनांती शिकवलं तर.......त्यांचा तो विचार. विचार करताच त्यांनी तो विचार अंमलात आणला. त्यासाठी लागत होती लागत. ती लागतही त्यांनी लोकसहभागातून मिळवली. विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी नवनवीन प्रयोग केलेत. त्यातूनच मुले प्रयोगांती बनली. मुलांनी शिष्यवृत्ती परीक्षेत आपली कामगिरी दाखवली. शिवाय कल्पनाशक्ती वापरुन व लोकांचा सहभाग घेवून त्यांनी शाळेचा विकास केला.एकंदरीत सांगायचं झाल्यास शाळेचा विकास झाला.

वारे गुरुजी चांगलं काम करीत होते. त्यांच्या प्रयत्नातून चांगले विद्यार्थी घडत होते. लोकं सहल आयोजन करुन आपल्या विद्यार्थ्यांना त्या शाळेपासून प्रेरणा देत होते. स्वतः त्या शाळेला भेट देवून व प्रेरीत होवून ते प्रयोग आपल्या शाळेत करीत होते.

ते मॉडेल होते इतर शाळांसाठी. इतर शाळेनही तेच प्रकल्प वापरुन आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचा विकास करायला हवा होता. परंतु चांगल्या कामाची कधीच किंमत होत नाही अन् चांगल्या माणसांचीही लोकांना किंमत वाटत नाही. चांगली माणसं जर अधिकारपदावर आलीच तर त्यांना कसं पदच्यूत करता येईल याचाच विचार होत असतो घडोघडी. कारण आजच्या काळात कोणीच कोणाची प्रगती झालेली पाहू शकत नाहीत. कारण असतं, आपण तशा स्वरुपाचं करु न शकणं. त्यातूनच द्वेष निर्माण होत असतो. हा द्वेष एकदा का मनात निर्माण झाला की बस. पुढील व्यक्ती कसा संपेल यासाठी संधी शोधणं सुरु होतं. काही काही ठिकाणी तर इज्जतीचाही भाजीपालाच केला जातो. मग दोषारोप होतात. निलंबनही. कारण काही लोकं समाजात असेही असतात की जे स्वतःही काही करीत नाहीत व दुसरा करीत असेल तर त्यालाही काही करु देत नाहीत. त्याचंही कारण असतं, त्याला तसं करता न येणं.

वारे गुरुजींबाबत तेच घडलं. त्यांनी शाळेलाच नाही तर संपूर्ण पंचक्रोशीला इज्जत मिळवून दिली. त्या शाळेचं नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेलं. हेच खुपलं काही समाजकंटकांना. त्यातच त्यांच्यावर तथाकथित आरोप प्रत्यारोप झालेत. मग त्यांचं निलंबन झालं व चौकशी लागली. अशी चौकशी की ज्यातून त्यांच्यासारख्या इमानदार व्यक्तीमत्वाला नोकरीवरुन हात धुवावे लागेल. परंतुवारे गुरुजी इमानदार होते. त्यांनी निःस्वार्थ मेहनत घेतली होती वाबडेवाडीतील विद्यार्थ्यांसाठी. हे त्यांनाही वाटत होतं. त्यांना त्यांच्या इमानदारीपणावर विश्वास होता. शेवटी वारे गुरुजी जिंकले. ते आरोपमुक्त झाले. परंतु या आरोपमुक्तीनंतर त्यांना वाबडेवाडीतील शाळा मिळाली नाही. ज्या शाळेत त्यांनी मुलं घडवली होती. ज्या शाळेतून त्यांनी स्वप्न पाहिले होते अन् ज्या शाळेच्या विद्यार्थ्यांचा त्यांनी विकास केला होता. आज ते दुसऱ्याच शाळेत आहेत. ती शाळा की ज्या शाळेत तीन विद्यार्थी होते. जी शाळा आदिवासी भागात आहे.

शिक्षक म्हणून काम करीत असतांना काही शिक्षक शाळेतील विद्यार्थ्यांना केवळ शिकवीतच नाही तर त्या शाळेचं नंदनवनच करतात. त्या शाळा कुठेही असल्या तरी. ते शिक्षक त्या शाळेत शिकवायला जातात. तेव्हा पटसंख्याही आपोआपच वाढते. वारे गुरुजी आदिवासी भागातील शाळेत गेले. त्यांनीच इथंही चांगले प्रयोग केले. उपक्रमही राबवले. त्यातच त्या शाळेत जेव्हा ते लागले होते. तेव्हा तीन विद्यार्थी होते. आज एक वर्षात शंभर विद्यार्थी आहेत. ते इमानदार होते म्हणून त्यांनी पादत्राणे त्यागली. आजही ते पादत्राणे वापरत नाहीत. कारण त्यांना आजही खंत आहे वाबडेवाडीतील शाळेची. त्या विद्यार्थ्यांची की ज्या विद्यार्थ्यांचं समाजातील समाजकंटकामुळं नुकसान झालं. आता ते केव्हा पादत्राणे वापरतील हे निश्चीत नाही.

वारे गुरुजींबद्दल सांगायचं झाल्यास खरं तर त्यांचे प्रयोग शाळेशाळेतून राबवायला हवे होते. त्यांची मुलाखत टिव्ही चॅनलवर गाजवायला हवी होती. परंतु तसं काहीच घडलं नाही.

समाजात असे बरेच लोकं असतात की जे प्रसिद्धीच्या पहिल्या स्तरावर असतात. तेव्हा त्यांच्याबद्दल काहीच वाटत नाही. परंतु जेव्हा ते यशाच्या शिखरावर पोहोचतात. तेव्हा त्यांना वेळोवेळी मदत करणारेही त्यांना मदत करीत नाहीत. वारे गुरुजींबाबत तेच घडलं होतं.

महत्वाचं सांगायचं झाल्यास माणसानं कोणाचाही द्वेष करु नये. कुणी जर समोर जात असेल तर ते त्याचं प्रारब्धच असतं. आपण त्याला जळू नये वा त्याच्यावर दोषारोप करु नये. जर करायचेच असेल तर त्याचं अनुकरण करावे. त्यानुसार त्याच्यातील गुण उपयोगात आणून आपला विकास करण्याचा प्रयत्न करावा. त्यासोबतच आपल्या परीसराचा देखील विकास करावा. जेणेकरुन त्यामुळं आपलाच नाही तर आपल्या देशाचाही विकास होईल. ज्यातून देशाला महासत्ता बनवता येईल यात शंका नाही.

**– अंकुश शिंगाडे नागपूर**

# बंडखोर उमेदवार काडादी यांना शिंदे पिता–पुत्रीचा पाठिंबा, शिवसेनेचा संताप

सोलापूर : महाविकास आघाडीअंतर्गत शिवसेना उद्धव ठाकरे आणि काँग्रेस पक्षाने प्रतिष्ठेच्या केलेल्या सोलापूर दक्षिण मतदारसंघात महाविकास आघाडीने उतरविलेल्या शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या उमेदवाराविरुद्ध काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि त्यांच्या कन्या खासदार प्रणिती शिंदे यांनी अखेर बंडखोर उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये बिघाडी होऊन शिंदे पिता–पुत्रीच्या या भूमिकेबद्दल शिवसेनेने संताप व्यक्त केला आहे.

सोलापूर दक्षिणच्या जागेवरून महाविकास आघाडीमध्ये सुरुवातीपासून वाद सुरू होता. काँग्रेस या जागेसाठी अखेरपर्यंत आग्रही होती. मात्र जागा वाटपात अखेर ही जागा शिवसेनेकडे (उद्धव ठाकरे) गेली. यानंतर प्रत्यक्ष प्रचार सुरू असतानाही यावरून महाविकास आघाडीत खटके उडाले. पुढे तर याचे पडसाद संपूर्ण जिल्ह्यात उमटत महाविकास आघाडीत बिघाडी होण्यात झाले. सोलापूर दक्षिण, सोलापूर मध्य, सांगोला अशा मतदारसंघांत काँग्रेस आणि ठाकरे गटामध्ये सुरुवातीला असलेला विसंवाद पुढे एकमेकांवर चिखलफेक करण्यापर्यंत गेला. याबाबत सोलापुरात उद्धव ठाकरे प्रचारासाठी आले असता त्यांनीही सभेत जाहीरपणे याबाबत काँग्रेस आणि सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांना आघाडीचा धर्म पाळण्याची आठवण करून देत एकप्रकारे इशाराच दिला होता. परंतु शिंदे कुटुंबीय, काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते अखेरपर्यंत आघाडीच्या प्रचारात सहभागी झाले नाही. या सर्वांत टोक आज गाठले गेले. आज मतदानाच्या दिवशी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि त्यांच्या कन्या खासदार प्रणिती शिंदे यांनी बंडखोर उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा जाहीर करत तसे मतदान करण्यास सांगितले. त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये अगोदरच बिघडलेले वातावरण आणखी बिघडत शिंदे पिता–पुत्रीच्या या भूमिकेबद्दल ठाकरे गटाने याबद्दल संताप व्यक्त केला.

मागील २०१४ आणि २०१९ च्या दोन्ही निवडणुकांत भाजपने ही जागा जिंकली असली तरी दोन्ही वेळा काँग्रेस पक्षाचा उमेदवार द्वितीय स्थानावर राहिला आहे. परंतु शिवसेनेने गडबड करून ही जागा स्वतःकडे घेऊन केलेली चूक आपण त्यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे सुशीलकुमार शिंदे यांनी पाठिंबा जाहीर करताना सांगितले.

सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे प्रमुख धर्मराज काडादी हे सुसंस्कृत, शांत, सर्वांना सोबत घेऊन जाणारे नेते आहेत. त्यांना चांगले भवितव्य आहे, अशा शब्दांत शिंदे यांनी त्यांच्या उमेदवारीचे समर्थन केले. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील यांचा अपवाद वगळता अन्य सर्व काँग्रेस नेते काडादी यांच्या प्रचारात गुंतले होते.

दरम्यान, सुशीलकुमार शिंदे आणि त्यांच्या कन्या खासदार प्रणिती शिंदे यांनी आघाडीचा धर्म बाजूला ठेवून अपक्ष धर्मराज काडादी यांना पाठिंबा देऊन शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचा केसाने गळा कापण्याची प्रतिक्रिया या पक्षाचे उपनेते शरद कोळी यांनी व्यक्त केली आहे. शिंदे कुटुंबीयांची भाजपशी आतून हातमिळवणी झाली आहे. काँग्रेस हीच आता भाजपची ‘बी टीम’ झाल्याची टीका ठाकरे गटाने केली.

# १११ वर्षाच्या आजीचे उत्साहात मतदान; तरुण मतदारांना मतदानासाठी बाहेर पडण्याचे केले आवाहन

गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीत मतदार मोठ्या संख्येत उत्साहाने मतदानासाठी बाहेर पडले आहेत.सकाळी ७ वाजेपासूनच प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात झाली आहे. लोकशाहीच्या या उत्सवात तरुण मतदारांनाही लाजवणारा उत्साह दाखवत येथील १११ वर्षांच्या आजींनी मतदान केंद्रावर जाऊन प्रत्यक्ष मतदान केले.

फुलमती बिनोद सरकार (वय १११) असे त्या आजींचे नाव असून त्या मुलचेरा तालुक्यातील गोविंदपूर येथील रहिवासी आहेत. फुलमती सरकार यांचा जन्म १ जानेवारी १९१३ रोजी झाला. आजीला चालता येत नसल्याने प्रशासनाने चारचाकी वाहन आणि व्हील चेअरची व्यवस्था केली होती.आजीने प्रत्यक्ष मतदान करत मतदारांमध्ये उत्साह निर्माण केला. आजींच्या मतदानाचा उत्साह कौतुकास्पद होता. तर मतदानाकडे पाठ फिरविणाऱ्या तरुण वर्गासाठी १११ वर्षांच्या आजींचा हा उत्साह आदर्शवत होता.

भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षावरील मतदारांसाठी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून दिली होती. त्या कालावधीत गृह मतदान प्रक्रिया सुद्धा राबविण्यात आली. मात्र फुलमती सरकार या वृद्ध आजीने मतदान केंद्रावरच जाऊन प्रत्यक्ष मतदान करण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी आज प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले.



लोकशाहीच्या उत्सवात तब्बल १११ वय असलेल्या या आजींनी प्रत्यक्ष सहभाग घेऊन मतदान करणे ही अभिमानास्पद बाब आहे. त्यांनी गृह मतदान नाकारून लोकशाहीच्या उत्सवात प्रत्यक्ष सहभाग घेतला.एवढेच नव्हे, तर तिने आपल्या बांगला भाषेत सर्वांना मतदान करण्याचे आवाहन देखील केले हे विशेष.

**प्रशासनाने शाल–श्रीफळ देऊन केले स्वागत**

फुलमती बिनोद सरकार या आजीला प्रशासनाने चारचाकी वाहनातून मतदान केंद्रावर आणले. त्यांनतर शालेय विद्यार्थी,गावकरी तसेच प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पुष्पांचा वर्षाव करत मतदान केंद्राच्या आवारात स्वागत केले.त्यांनतर आजीने उत्साहात मतदानाचा हक्क बजावला. प्रशासनाच्या वतीने अहेरीचे अप्पर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी फुलमती बिनोद सरकार यांना शॉल,श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देत स्वागत केले.यावेळी मुलचेराचे गटविकास अधिकारी एल. बी. जुवारे,पुरवठा अधिकारी इंगोले,तलाठी रितेश चिंदमवार, ग्रामपंचायतचे सचिव अक्षय कुळमेथे तसेच आदी कर्मचारी उपस्थित होते.

**आचारसंहिता भंगाच्या १०१३४ तक्रारी निकाली; ७०६ कोटी ९८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त**

मुंबई : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर २०२४ दरम्यान राज्यभरात सी–व्हिजिल (उ–तळसळश्र) पवर एकूण १० हजार १३९ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी १० हजार १३४ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. सी–व्हिजिल पद्वारे नागरिक आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत तक्रार दाखल करू शकतात. हे प कोणत्याही पस्टोअरमधून डाउनलोड करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते. राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी १५ ऑक्टोबरपासून बेकायदा पैसे, दारू, अमली पदार्थ, मौल्यवान धातू आदींच्या विरोधात केलेल्या कारवाईत एकूण ७०६ कोटी ९८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

# अखेरच्या टप्प्यात जोर! सरासरी ६५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा निवडणुकीत बुधवारी राज्यात सरासरी ६५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले आहे. सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत मतांचा टक्का वाढल्याचे चित्र आहे. अखेरच्या काही तासांत मतदानाने जोर पकडल्याचे चित्र राज्याच्या काही भागांत दिसले. संपूर्ण आकडेवारी हाती आल्यानंतर मतदान ६८ टक्क्यांच्या घरात जाण्याची शक्यताही वर्तविण्यात येत आहे. मात्र मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर या शहरी भागांमध्ये काहीसा निरुत्साह कायम असल्याचे दिसले.

नाशिक जिल्ह्यासह राज्यातील काही केंद्रांवर रात्री नऊ वाजेपर्यंत मतदान सुरू होते. त्यामुळे मतदानाची जिल्हानिहाय अंतिम आकडेवारी येण्यास विलंब लागला असला तरी अखेरचे वृत्त हाती आले, तोपर्यंत मतदानाने ६५ची टक्केवारी गाठली होती. यात आणखी भर पडण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यात ६१.२९ टक्के मतदान झाले होते. त्या तुलनेत मतदानात वाढ होण्याचा अंदाज आहे. मुंबई, ठाणे, पुणे आणि नागपूर या चार मोठ्या शहरांमध्ये टक्का वाढविण्यासाठी निवडणूक आयोगाने विशेष प्रयत्न केले होते. मात्र त्याला फारसे यश आले नसल्याचे (पान ८ वर) (पान १ वरून) दिसले. राज्यात सर्वाधिक ८२ टक्के मतदान कोल्हापूर जिल्ह्यातील कागल मतदारसंघात झाले आहे. तेथे वैद्याकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार) समरजितसिंह घाटगे यांच्यातच चुरशीची लढत होत आहे. सर्वात कमी ४१ टक्के मतदान हे कल्याण पश्चिम मतदारसंघात झाले आहे. मंत्रालय व विधानभवन ही सत्तेची प्रमुख केंद्रे असलेल्या कुलाबा मतदारसंघांत टक्केवारी वाढविण्यासाठी बरेच प्रयत्न झाले असले तरी ४५ टक्केच मतदान झाले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत निवडणूक आयोगाने मतदान केंद्रांची संख्या वाढविल्याने शहर व उपनगरातील काही भागांमध्ये मतदानासाठी मोठ्या रांगा लागण्याचे प्रमाण तुलनेने कमी होते. असे असले, तरी मुंबई महानगर प्रदेशामध्ये यावेळीही निरुत्साहाचे वातावरण कायम होते. मुंबई शहर, उपनगर आणि ठाणे जिल्ह्यांत ५० ते ५५ टक्क्यांच्या आसपास मतदान झाले. त्या तुलनेत शहराच्या मुस्लिमबहुल भागांमध्ये मतदानाचा जोर दिसून आला.



लोकसभा निवडणुकीत सुमारे दीड हजार मतदारांमागे एक मतदान केंद्र होते. यावेळी एक हजार ते बाराशे मतदारांमागे केंद्र देण्यात आल्यामुळे लांब रांगा लागल्याचे दृष्य फारसे दिसले नाही. सकाळपासून ११ वाजेपर्यंत मतदारांची ये–जा सुरु असली मोठ्या रांगा नव्हत्या. आयोगाने आदेश दिल्याने बहुतांश केंद्रांवर मतदारांना बसण्यासाठी खुर्च्या व बाकड्यांची आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र रांगा तुरळकच असल्याने खुर्च्या रिकाम्याच होत्या. अनेक ठिकाणी मतदारांना केंद्राच्या आवारात शिरतानाच मोबाईल बंद करण्याच्या सूचना देण्यात येत होत्या. मतदान कक्षात बंदी असताना आवारात शिरतानाच मोबाईल बंद करण्यावरून पोलिस आणि मतदारांमध्ये वादावादीचे प्रकार घडले.

मुलुंड, भांडुप, कांजुरमार्ग, विक्रोळी, पवई, घाटकोपर, माहीम आदी भागातील अनेक मतदान केंद्रांमध्ये दुपारपर्यंत मतदानाचे प्रमाण २५–२७ टक्क्यांपर्यंत होते. शिवसेना शिंदे व ठाकरे गट, भाजप आदी पक्षांच्या मतदान केंद्रांजवळील टेबलांवर कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. मात्र बहुतांश मतदारांना ऑनलाईन पद्धतीने आणि उमेदवारांकडून आधीच मतदान केंद्र, यादी क्रमांक आदी तपशील मिळाला असल्याने या टेबलांवरही मतदारांची गर्दी फारशी नव्हती.

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी निवडणूक आयोग, राजकीय पक्षांचे नेते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी जनतेला आवाहन केले असतानाही लोकसभेच्या तुलनेत मतदानाचे प्रमाण खूप वाढले असल्याचे चित्र नव्हते. चांदिवली, जोगेश्वरी, फिल्टरपाडा, आग्रीपाडा, पठाणवाडी, नागपाडा आदी मुस्लिमबहुल परिसरातील केंद्रांवर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. त्यात ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाणही मोठे होते. भायखळ्यातील सुशांती चर्च प्राथमिक शाळा, महापालिकेच्या वाहनतळातील मतदान केंद्रावर हेच चित्र दिसत होते.

मुंबई शहराच्या तुलनेत उपनगरांमधील मतदान काहीसे वाढले. लोकसभेला मुंबई जिल्ह्यात ५१.३६ तर उपनगर जिल्ह्यात ५४.९७ मतदान झाले होते. यावेळी उपनगर जिल्ह्यात अखेरचे वृत्त हाती आले तोपर्यंत ५६ टक्के मतदान झाले होते. यात सर्वाधिक ६२ टक्के मतदान भांडूप पश्चिम मतदारसंघात झाले असून बोरीवली आणि मुलुंडमध्येही ६१ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. चांदिवलीमध्ये सर्वात कमी ४८ टक्के मतदान झाले आहे. मुंबई शहर जिल्हयात वडाळा मतदारसंघात सर्वाधिक ५८ टक्के तर कुलाब्यात सर्वांत कमी ४५ टक्के मतदान झाले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### मतदारांना बिर्याणीचे आमिष; तीन जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : मतदारांना बिर्याणीचे आमिष दाखवल्या प्रकरणी तीन जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, लोकांना विशिष्ट राजकीय पक्षाला मत द्यावे याकरिता चिकन बिर्याणी बनवून ती लाच म्हणून वाटप करण्याच्या उद्देशाने तयार करीत असताना बिर्याणी करण्यासाठी लागणाऱ्या साहित्यासह तिघेजण मिळून आल्याची फिर्याद नितीन ज्ञानेश्वर इरकल (वय-४४,रा.विद्युत कॉलनी,अभिषेक पार्क) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अशोक कृष्णा दुस्सा,(रा.गीता नगर),प्रकाश व्यंकप्पा माघनुर (रा.तेलंगी पाच्छा पेठ) व शिवकुमार मलाय्या नक्का (रा.निकम नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १९ नोव्हेंबर रोजी रात्री पावणे अकरा वाजण्याच्या सुमारास श्रीकृष्ण मंगल कार्यालयाच्या पाठीमागील असलेल्या मोकळ्या जागेत कमटम वसाहत येथे घडली. या घटनेचा पुढील तपास मसपोनि. घोरपडे या करीत आहेत.

# पंढरपुर मतदारसंघात ६९ टक्के मतदान

## सायंकाळी ६ नंतरही अनेक मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा, ठिकठिकाणी उशिरापर्यंत मतदान सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघासाठी बुधवारी झालेल्या मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदवून ५९ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

सायंकाळी ६ नंतरही अनेक मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा पहावयास मिळाल्या.

पंढरपूर शहर आणि तालुक्यात अनेक ठिकाणी उशिरापर्यंत मतदान सुरू होते.

सायंकाळी ६ वाजेपर्यंत १ लाख ३४ हजार २८४ पुरुष तर १ लाख २३ हजार ४२३ महिला असे एकूण २ लाख ५७ हजार ७२६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता.

सकाळपासूनच मतदानाची टक्केवारी कमी होती. मात्र दुपारनंतर मतदानाचा टाका वाढला.

सकाळी ११ वाजेपर्यंत १२.२२% दुपारी १ वाजेपर्यंत २४.२६% दुपारी ३ वाजेपर्यंत ३८.३०% सायंकाळी ५ वाजेपर्यंत ५४.१८% मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. सायंकाळी ६ वाजेपर्यंत ६९% मतदान झाले होते.

रात्री उशिरापर्यंत पंढरपूर शहरात शाळा नंबर ७, शाळा नंबर ९, रामबाग या मतदान केंद्रावर मतदान सुरू होते.

यामुळे अनेक ठिकाणी बरेच वेळ मतदान सुरू होते. यामुळे जवळपास ६९ टक्के मतदान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# इंदापूरात अपक्ष उमेदवारांच्या वचनाम्याची जनतेत जोरदार चर्चा

## आमदारांना शासनाकडून मिळणारा दर महिन्याचा पगार मी तालुक्यातील गोर गरीब मुलींच्या शिक्षणासाठी तसेच औषध उपचारासाठी वर्ग करणार

इंदापूर/प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे

इंदापूर : माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या पक्षांतरामुळे गाजलेल्या इंदापूर मतदारसंघात यंदा चुरशीची लढत होत आहे. लागोपाठ दोन पराभवांनंतर यंदा कोणत्याही परिस्थितीत बाजी मारायचीच, या निर्धाराने पाटील रिंगणात उतरले असले तरी मतदारसंघातील नाराजी, नातेवाईकांनी सोडलेली साथ आणि एकवटलेले विरोधक या साऱ्यांवर मात करण्याचे मोठे आव्हान पाटील यांच्यासमोर आहे.

इंदापूरमध्ये २०१४ ला काँग्रेस तर २०१९ मध्ये भाजपचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांचा पराभव झाला होता. यंदा पाटील हे राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे उमेदवार आहेत. गेल्या दहा वर्षांत तीन पक्षांतून निवडणूक लढविणाऱ्या पाटील यांच्यासमोर आव्हाने मोठी आहेत. २०१९ मध्ये शरद पवारांची जादू या मतदारसंघात चालली आणि भरणे यांना विजय मिळाला. यंदा शरद पवार यांची या भागातील ताकद हर्षवर्धन पाटील यांना फायदेशीर ठरते का, याची उत्सुकता आहे.



महायुतीमध्ये इंदापूर मतदारसंघाची जागा राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाकडे जाणार असल्याने नाराज झालेल्या हर्षवर्धन पाटील यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला. पक्षप्रवेश होताच पाटील इंदापूरचे उमेदवार असतील, अशी घोषणा पवार यांनी केली. त्यामुळे पक्षातील नाराजी उफाळून आली. सोनाई उद्योगसमूहाचे संचालक प्रवीण माने यांच्यासह पुणे जिल्हा बँकेचे संचालक अप्पासाहेब जगदाळे यांनी बंडाचा पवित्रा घेतला.

**निर्णायक मुद्दे**

१ लोकसभा निवडणुकीत बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांना या मतदारसंघातून मताधिक्य मिळाले होते. त्यामुळे महाविकास आघाडीची ताकत पाटील यांच्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

दत्तात्रय भरणे यांना विविध समाजघटकांनी पाठिंबा जाहीर केला आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादीमधील पाटील यांच्याविरोधातील नाराजीही भरणे यांच्यासाठी जमेची बाजू ठरणार आहे. अपक्ष प्रवीण माने कोणत्या राष्ट्रवादीची मते घेणार, यावरही विजयाची गणिते निश्चित होणार आहेत.

**अपक्ष उमेदवार प्रवीण माने यांनी पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपर वरती वचनामा जाहीर केल्याने या वचनाम्याची सर्वत्र चर्चा होत असून नको आजी नको माझी इंदापूरकरांना हवा नवाबाजी आमदार असावा तर असा असेही बोलले जात आहे.**

तालुक्यातील सुजाण मतदारांना उमेदवार या नात्याने लिहून देतो की, उमेदवार हा जनतेचा सेवक असतो याची मला जान आहे. त्यामुळे मी इंदापूर तालुक्यातील जनतेच्या आशीर्वादाने निवडून आलो तर खाली दिलेल्या वचनांना मी बांधील राहील.

मी प्रविण दशरथ माने संपुर्ण कार्यकाळ सेवक म्हणून गोरगरीब, महिला, तरुण, वृध्द लोकांसाठी सहज उपलब्ध होईल.

मी निवडुन आल्यानंतर मी किंवा माझ्या कुटुंबातील कोणीही सदस्य कसलं ही कंत्राट घेत नाहीत व येथुन पुढेही घेणार नाही.

आमदारांना शासनाकडून मिळणारा दर महिन्याचा पगार मी तालुक्यातील गोर गरीब मुलींच्या शिक्षणासाठी तसेच औषध उपचारासाठी वर्ग करणार.

**आमदारांचा पगार जनतेला देणार**

इंदापूर मधील एम. आय. डी. सी. मध्ये नविन उदयोग धंदे निर्माण करून तसेच उदयोग धंदयांना चालना देवुन इंदापूर तालुक्यातील हजारो तरुणांना रोजगार निर्मीती करणार.

मला जनतेने मतदान रूपी आर्शिवाद देवुन निवडुन दिले तर तालुक्यातील युवकांना स्पर्धा परिक्षा देण्यासाठी सुसज्ज सर्व सुविधा असलेली अॅक्ॅडमी उभा करणार.

आज पर्यंत चालु असलेले सामाजिक कार्य यामध्ये सामुदायीक विवाह सोहळा, डोळ्याची ऑपरेशन, महिला व तरुणांसाठी विविध सामाजिक उपक्रम हे कायम चालु राहतील. मतदानरूपी आशिर्वाद मिळाल्यास यामध्ये आणखी भर घालु.

जनतेच्या आर्शिवादने मी निवडुन आल्यास इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्याचा ऊसाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्व तोपरी प्रयत्न करणार.

इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्याच्या हक्काचे पाणी (कॅनॉल व उजनी धरण ) मिळवुन देण्यासाठी टोकाचा संघर्ष करण्याची तयारी ठेवेन.

मला तुम्ही निवडुन दिल्यानंतर जर माझ्याकडून भ्रष्टाचार झाला तर मी कायमस्वरूपी राजकीय संन्यास घेईल असे ही प्रवीण भैया माने यांच्या स्टॅम्प पेपर वरती लिहिलेले आहे.



# ब्राह्मण महासंघाचा समाधान आवताडे यांना पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर ब्राह्मण महासंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार समाधान आवताडे यांना पाठिंबा. जाहीर केला आहे. सोमवारी पंढरपूर ब्राह्मण महासंघाच्या सदस्यांच्या सभासदांची बैठक सौ प्रणिती दामोदर भक्ती उत्पादन यांच्या निवासस्थानी पार पडली यावेळी ब्राह्मण समाज बांधव उपस्थित होते.

ब्राह्मण संघटन युवक संघटना बांधणे आगामी पंढरपूर प्राधिकरण साधक बादक परिणाम सहल नियोजन आणि उमेद अंतर्गत तरुणाचे संघटन यावर चर्चा कृती आढावा घेण्यात आला व युवक संघटना ८० टक्के कार्य पूर्णत्वास गेल्या असून लवकरच युवक महोत्सव कार्यक्रम आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती तर उपाध्यक्ष चैतन्य केसकर यांनी दिली.

**अवताडे यांनी परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे मागणी केल्यामुळे समाजातून पाठिंबा**

यावेळी विधानसभा निवडणुकीत पंढरपूर मतदार संघातील विद्यमान आमदार समाधान आवताडे यांना पाठिंबा देण्याची सर्वानुमती ठरले.

आगामी काळात संघटनात्मक तरुणांची संख्या विस्तार व उद्योग बाबत ध्येयधोरणे याबाबत जिल्हा संघटक अंमल कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले व सहली व व्यवस्थापन अमृता कुलकर्णी यांनी माहिती दिली.

तालुका उपाध्यक्ष पिंटू कुलकर्णी सचिव पदी मनोज राजगुरू तर संपर्क प्रमुख पदी ओंकार कुलकर्णी तपकिरी शेटफळ यांची नियुक्ती करण्यात आली. आभार जिल्हा संघटक अमृता बडवे यांनी मानले मानले यावेळी जेष्ठ अशोक कुलकर्णी प्रदीप कुलकर्णी आधी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणूक नायब तहसीलदारासोबत हुज्जत घातल्याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : निवडणूक नायब तहसीलदारासोबत हुज्जत घातल्या प्रकरणी पाच जणांविरुद्ध सदर बजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १९ नोव्हेंबर रोजी दुपारी सव्वा दोन वाजण्याच्या दरम्यान नूतन मराठी विद्यालय येथील निवडणूक साहित्य वाटपाच्या ठिकाणी घडली. याप्रकरणी सुधाकर तुकाराम बंडगर (वय-५०,रा. नेमणूक निवडणूक नायब तहसीलदार,रा.मंत्री चंडक रेसिडेन्सी,विजापूर रोड) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून शिवाजी दिगंबर उबाळे (वय-५७,रा.नेम.कै.अण्णासाहेब साठे प्रशाला यांची केंद्राध्यख रा.मु.पो खंडाळी ता.मोहोळ जि.सोलापूर),चिकमाने अनिल व्हनप्पा (वय-५२,महासिध्द विदयालय डोणज यांची केंद्राध्यक्ष रा.मुपो संभाजी नगर,मंगळवेढा),धुमाळ नागनाथ लिंगा (वय-५७,नेम-विदयानिकेतन प्रशाला सोलापूर यांची एफ.पी.ओ १ रा-मु. पो वाळूज ता.मोहोळ),अमोल विठ्ठल डेंगळे,(वय-४७,रा-कवठेकर प्रशाला पंढरपुर) यांची एफ.पी.ओ-१ रा कुर्डवाडी ता.माढा),अशोक बंडप्पा पाटील, (वय-५५,ने झेडपी पी.एम. स्कूल कोंडी यांची ओ. पी.ओ-१ रा आहेरवाडी ता दक्षिण सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, नूतन मराठी विद्यालय सोलापूर येथे निवडणूक साहित्य वाटपावेळी निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने निवडणुकीच्या कामकाजासाठी वरील संशयित आरोपी यांची नेमणूक करण्यात आली असता, बदली कर्मचारी म्हणून मतदान केंद्रावर पाठवण्यासाठी वारंवार सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार उत्तर सोलापूर यांनी लाऊड स्पीकरवर त्यांच्या नावाची घोषणा केली. तरीदेखील वरील कर्मचारी हे पात्र सर्व पोलिंग पार्टीवर गेल्यानंतर व मतदान पेट्यांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास उपस्थित होऊन आम्ही येथेच होतो, मतदान प्रक्रियेतील नियुक्तीचे ठिकाणी देण्यात आलेली कर्तव्य पार पाडण्याकरिता जाणार नसल्याबाबत सांगून तहसीलदार यांच्याशी हुज्जत घातली. त्यामुळे साहित्य वाटप प्रक्रियेच्या दरम्यान अडचणी व अडथळा निर्माण करून कर्तव्य पार पाडण्यात टाळाटाळ केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार जाधव हे करीत आहेत.

**कार्तिकी यात्रा; श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे परंपरेनुसार २४ तास दर्शन सुरू**

**व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांची माहिती**

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मातेची प्रक्षाळपुजा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (ता.२०) कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे परंपरेनुसार २४ तास दर्शन असते. त्यानुसार दि.०४ नोव्हेंबर रोजी श्रीचा पलंग काढून श्री पांडूरंगास लोड व श्री रूक्मिणी मातेस तक्या देवून २४ तास दर्शन सुरू करण्यात आले होते. या २४ तास दर्शन कालावधीत देव २४ तास उभा असल्याने, मुहुर्त पाहून देवाची विधिवत प्रक्षाळपुजा करून श्रींचे पूर्वीप्रमाणे नित्योपचार सुरू करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

दि. २० नोव्हेंबर रोजीच्या मुहूर्तानुसार श्री विठ्ठलाची व श्री रूक्मिणी मातेची प्रक्षाळपुजा संपन्न झाली. सदर पूजेच्या पूर्वी संपूर्ण मंदिर स्वच्छ धुवून घेण्यात आले. पहाटे नित्यपुजा झाल्यावर देवाच्या मूर्तीस चांदीचे पाऊल लावण्यात आले. त्यावर भाविक लिंबू साखर लावतात. श्रींचा पलंग शेजघरामध्ये ठेवण्यात आला.





दुपारी १२.२० ते १२.३० या वेळेत श्री.पांडूरंगास व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते पहिले स्नान घालण्यात आले. तसेच दुपारी २.२० ते ५.३० पर्यंत श्री. पांडूरंगास रूद्राभिषेक अकरा ब्रम्हवृंदामार्फत करण्यात आला. त्यावेळी देवास तेल लावून अभ्यंगस्नान घालण्यात आले. त्यानंतर मुर्ती स्वच्छ करून दुधाचा अभिषेक करण्यात आला व देवाचा पोषाख, अलंकार व महानैवेद्य दाखवून आरती करण्यात आली असून, यात्रेसाठी बंद केलेले काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इत्यादी राजोपचार सुरू करण्यात आले. तसेच रात्रौ शेजारतीच्या वेळी देवाचा शिणवटा घालवण्यासाठी आयुर्वेदिक (विविध वनस्पती, सुकामेवा, सुंठ, काळे मिरे इ.) काढा देवाला दाखविण्यात आला. तसेच दि.२१ नोव्हेंबर पासून भाविकांच्या हस्ते होणाऱ्या तुळशी अर्चनपूजा, पाद्यपुजा व नित्यपुजा देखील सुरू करण्यात येत आहेत.

श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेची प्रक्षाळपुजा अनुक्रमे मंदिर समिती सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर तसेच व्यवस्थापक मनोज श्रोत्री व लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांच्या हस्ते करण्यात आली. तसेच या प्रक्षाळपुजे निमित्त मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. या पूजेच्या वेळी मंदिरात पौराहित्य करणारे कर्मचारी, विभाग प्रमुख संजय कोकीळ व अतुल बक्षी उपस्थित असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

अमोल बाळासाहेब शेरे, अभिजीत विठ्ठल मोहिते, राहुल ताम्हाणे, राजू शेठ नाईक या दानशूर भाविकांनी भगवा गोंडा ४०० किलो, पिवळा गोंडा ४०० किलो, शेवंती १००० किलो, कामिनी २०० किलो, अष्टर ७०० किलो, रिबीन ३ किलो, कबूतर २०० किलो, स्प्रे (रंगीत) इत्यादी फुलांचा वापर करून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व नामदेव पायरी येथे आकर्षक फुलाची सजावट केली असून, यासाठी ४० कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली आहे.

# राज्यात महायुती, मविआमध्ये चुरस

(पान १ वरून...)

महायुतीला १५२ ते १६०, महाविकास आघाडीला १३० ते १३८ आणि अन्यला ६ ते ८ जागा मिळण्याची शक्यता असल्याचे म्हटले आहे.

Dainik Bhaskarच्या एक्झिट पोलनुसार राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्ते देण्याची शक्यता आहे. या पोलनुसार मविआला १३५ ते १५० जागा मिळतील असे म्हटले आहे. तर महायुतीला १२५ ते १४० जागा मिळण्याचा अंदाज वर्तवला आहे. अन्यला २० ते २५ जागा मिळतील.

Poll Diaryच्या एक्झिट पोलनुसार राज्यात भाजपला ७७ ते १०८ जागा, शिवसेना शिंदे गटाला २७ ते ५०, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला १८ ते २८ जागा मिळण्याची शक्यता आहे. महायुतीला २८८ पैकी १२२ ते १८६ जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.या एक्झिट पोलनुसार महाविकास आघाडीला राज्यात ६९ ते १२१ जागा मिळतील. मविआमधील काँग्रेसला २८ ते ४७, शिवसेना उद्धव ठाकरे गटाला १६ ते ३५ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला २५ ते ३९ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील विविध एक्झिट पोल एकत्र केल्यानंतर चित्र काय आहे याचा विचार केल्यास पोल्स ऑफ पोलनुसार राज्यात महायुतीला १५५ जागा मिळतील.

म्हणजे राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येणार. तर महाविकास आघाडीला १२२ जागांवर समाधान मानावे लागले. २८८ पैकी ११ जागा या अन्यला मिळतील असे दिसते.


# टक्का वाढला; सोलापूर जिल्ह्यात उत्स्फूर्तपणे मतदान


## जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसह जिल्ह्यातील मातब्बरांनी बजावला मतदानाचा हक्क
























## माढा मतदारसंघात उत्साहपूर्ण वातावरणात मतदान, सायंकाळच्या सुमारास मतदारांच्या रांगा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सोलापूर/प्रतिनिधी :

२४५ माढा विधानसभा मतदारसंघातील माढा व परिसरात विधानसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया बुधवारी शांततेत पार पडली. उत्साही मतदारांनी सकाळी मतदनाचे कर्तव्य पार पाडण्यास प्राधान्य दिले. सायंकाळी सहा वाजेपर्यंत दारफळ गावात ७५.९०% मतदान झाले.मतदानासाठी महिलांच्या रांगा लागलेल्या दिसून आल्या. तरुण मतदारांनी पहिल्यांदाच मतदान केल्याने मतदान केल्याचे कर्तव्य बोट दाखवून सेल्फी काढताना दिसून आले.

तसेच काही मतदान केंद्रावर लोकशाही उत्सव स्वागत करून करण्यात आला माढा विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार रणजित शिंदे यांनी निमगांव टें येथे तर महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित पाटील यांनी देगाव याठिकाणी मतदानाचा हक्क बजावला तसेच महा युतीच्या उमेदवार सौ मिनल ताई साठे यांनी माढा येथील मतदान केंद्रामध्ये आपला मतदानाचा हक्क सहकुटुंब बजावला.

तसेच सोलापूर जिल्हा शिवसेनाप्रमुख प्राध्यापक शिवाजीराव सावंत यांनी वाकाव या ठिकाणी आपला मतदानाचा हक्क बजावला माढा व परिसरातील ग्रामीण भागात ज्येष्ठ नागरिक व महिला मतदारांनी रांगा लावल्या होत्या.

महायुतीच्या उमेदवार मीनल ताई साठे तसेच सोलापूर जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत सर शिवसेना तालुकाप्रमुख मुन्ना साठे अपक्ष उमेदवार रणजीत शिंदे यांचे चिरंजीव युवा नेते कृष्णा शिंदे माढा पूर्व भागाचे युवा नेते पृथ्वीराज भैय्या सावंत यांनी माढा व परिसरातील मतदान केंद्रावर भेटी दिल्या. माढा व परिसरातील मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी माढा पोलीस स्टेशनच्या वतीने तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता तसेच मतदान केंद्रावरती पिण्याचे पाण्याची सोय आरोग्याची तत्पर सेवा उपलब्ध करून दिली होती.